ISSN - 2347-7075
Impact Factor - 8.141

# INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH

**Double-Blind Peer Reviewed / Bi-Monthly / Referred / Open Access Research Journal**



Vol. 13 No. 3
January – February - 2026

Young Researcher Association, Kolhapur (Maharashtra)

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

ISSN – 2347-7075

Impact Factor– 8.141

**January – February 2026**

**Volume-13** **Issue- 3**

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India
***Website:*** https://ijaar.co.in
**Submit Your Research Paper on Email**
**Regular Issue:** editor@ijaar.co.in
For Publication Call On - **8624946865**

INTERNATIONAL JOURNAL OF ADVANCE AND APPLIED RESEARCH
ISSN – 2347 -7075 (DOUBLE-BLIND Peer Reviewed) (Bi-Monthly Research Journal)
**Vol. 13 No. 3**
**January - February 2026**

**TABLE OF CONTENT**


| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. R. S. Salunkhe | Study Of the Impact of Artificial Intelligence on The Manufacturing Sector Special Reference to Selected Units in Sangli District | 1 to 4 |
| 2 | Dr. Mukund N. Haladkar | Artificial Intelligence in Trade, Commerce and Industry in India | 5 to 9 |
| 3 | Prof. Dr. Ashok Ramchandra Shinde | AI-Driven Accounting Practices: Enhancing Accuracy, Speed, And Transparency in Financial Reporting | 10 to 16 |
| 4 | Dr. S. S. Pawar | A Study of AI in Accounting and Finance | 17 to 24 |
| 5 | Dr. Sachin Rajendra Suryawanshi | Impact Of Artificial Intelligence on Marketing and Manufacturing Sectors | 25 to 29 |
| 6 | Dr. Mansingh S. Dabade<br>Dr. Ram Naik<br>Dr. Anil Suryawanshi | Replacing Jobs or Creating Opportunities: The Impact of Artificial Intelligence on Employment in Corporate Sector | 30 to 36 |
| 7 | Dr. Shreya Vinay Patil | Audit Ready AI: Enhancing Compliance with Intelligent Tool | 37 to 43 |
| 8 | Mr. Kashid Kapil Arvind<br>Mr. Redekar Akshaykumar Tanaji<br>Mr. Salate Sachin Gangaram | Artificial Intelligence in Trade and Commerce: Advantages and Disadvantages | 44 to 49 |
| 9 | Mr. Aditya Shridhar Bille | Artificial Intelligence and Accounting Practices: An Analytical Study of Financial Reporting, Auditing and Professional Transformation | 50 to 53 |
| 10 | Dr. Rani Gorakhnath Kirdat | The Transformative Impact of Artificial Intelligence on Marketing: Opportunities and Challenges | 54 to 57 |
| 11 | Prafullkumar Prakash Patil<br>Dr. Arun Chandu Shinde | AI Attitude and Educational Attitude Among Senior College Students | 58 to 63 |
| 12 | Dr. Santosh Barale<br>Dr. M. L. Sontakke | AI -Driven Trade and Commerce: Pathways to Inclusive Growth | 64 to 68 |
| 13 | Mr. Shivanand Arvind Bhandare | Opportunities And Challenges Before the Use of Artificial Intelligence (AI) In Marketing | 69 to 71 |
| 14 | Prof. Shirke M. S. | Artificial Intelligence in Libraries | 72 to 77 |
| 15 | S. G. Mulik | Integrating Artificial Intelligence into Commerce and Management Education: A New Era of Learning | 78 to 83 |
| 16 | Mrs. Prof. Pratibha Dattatraya Pudale | From Traditional Trade to Smart Trade: The Role of Artificial Intelligence | 84 to 87 |
| 17 | Dr. Jamadar Shahida Abdulrahim | An Examination of Artificial Intelligence in Marketing: Its Role and Impact on Marketers and Consumers | 88 to 94 |
| 18 | Dr. Ram Ningappa Naik | External Sector, Statistical Discrepancies and Gross Domestic Product Growth in India: A Constant and Current Price Analysis (2011–12 To 2025–26) | 95 to 98 |
| 19 | Dr. Sanjay Vilas Yadav | A Study on The Role of Green Innovation in Product Development | 99 to 105 |
| 20 | Dr. Sachin Vilas Yadav | The Impact of Artificial Intelligence on The Buying Behaviour of Two-Wheeler Customers | 106 to 110 |

| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 21 | Dr. Babasaheb Yashvant Saymote | Adoption Of Artificial Intelligence in Financial Services: A Secondary Data Perspective | 111 to 115 |
| 22 | Mr. Redekar Akshaykumar Tanaji<br>Mr. Kashid Kapil Arvind<br>Mr. Salate Sachin Gangaram | Role Of Artificial Intelligence in Global E-Commerce Growth | 116 to 120 |
| 23 | Mrs. Archana Kulkarni<br>Dr. Shreya Patil | Financial Literacy as A Mediator Between Artificial Intelligence and Investment Behaviour | 121 to 127 |
| 24 | Mrs. Mhaskar Ranjita Girish | A Review the Impact of Artificial Intelligence on Manufacturing Organizations | 128 to 135 |
| 25 | Mr. Salate Sachin Gangaram<br>Mr. Kashid Kapil Arvind<br>Mr. Redekar Akshaykumar Tanaji | Impact of Artificial Intelligence on Small Businesses | 136 to 139 |
| 26 | Neeta Rushikesh Bhaskar | Intelligence Transforming Global Trade and Commerce | 140 to 143 |
| 27 | Ms. Pratiksha Vikas Gosavi<br>Ms. Harshada Jadhav | A Research Study on Digital Signature | 144 to 148 |
| 28 | Mrs. Mrudula A. Moholkar | Artificial Intelligence: Transforming Global Trade and Commerce | 149 to 157 |
| 29 | Shreyas Nitin Gursal<br>Dr. Gajanan Kadam | AI and E-Commerce: Opportunities and Challenges for Emerging Economies | 158 to 163 |
| 30 | Mrs. Pawar Rutuja Jalindar<br>Miss. Jyoti Bharat Kadam | A Study On "Technology in Society: Ethical Challenges of Artificial Intelligence and the Impact of Social Media" | 164 to 167 |
| 31 | Mrs. Pawar Rutuja Jalindar<br>Miss. Jyoti Bharat Kadam | The Impact of Buy Now, Pay Later Services on Consumer Debt Levels | 168 to 172 |
| 32 | डॉ. कन्नाडे ममता कार्तिक | भारतीय समाजाच्या अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेची (**AI**) भूमिका | 173 to 179 |
| 33 | Manali Mangesh Gawade | AI Attitude, Psychological Well Being and Perceived Stress Among College Students | 180 to 186 |
| 34 | Sumit Balkisan Rathi | Artificial Intelligence and E-Commerce | 187 to 193 |
| 35 | प्रा. वर्षा संदीप पाटील | ए आय आणि ई कॉमर्स | 194 to 198 |
| 36 | Miss. Laxmi Anil Salunke | Artificial Intelligence Transforming the Forensic Science | 199 to 205 |
| 37 | Mrs. Pallavi Navjeevan Wadkar | AI In Accounting and Finance: Transforming Reporting, Risk and Decision Making | 206 to 211 |
| 38 | Adv. Vivek Vishwanath Bongale | From Studio to Social Media: Role of AI In Advertisement and Branding of Photography Businesses | 212 to 218 |
| 39 | श्री. आकाश राजाराम चव्हाण | सांस्कृतिक वारसा आणि स्मारकांच्या पुनर्रचनेसाठी ३ डी मॉडेलिंग व **AI** तंत्रज्ञानाचा वापर : एक अभ्यास | 219 to 225 |
| 40 | Dr. (Mrs.) S. R. Nakate | A Study on The Impact of Artificial Intelligence on Job Security of Software Engineers in Pune | 226 to 231 |
| 41 | समाधान आबा जाधव | प्राचीन भारतीय कुलूप रचना आणि अभियांत्रिकी कौशल्य – एक तुलनात्मक अभ्यास | 232 to 237 |
| 42 | Dhanashri Basaveshwar Jangam | A Research Paper on Machine Learning | 238 to 240 |
| 43 | डॉ. नामदेव शामराव आडनाईक<br>प्रा. खुतबुद्दीन इलाही मुलाणी | कृत्रिम बुद्धिमत्तेचा कृषि भूगोलातील वापर आणि भविष्यातील दिशा | 241 to 245 |

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

Original Article

# भारतीय समाजाच्या अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) भूमिका

डॉ. कन्नाडे ममता कार्तिक

समाजशास्त्र विभाग प्रमुख, चंद्राबाई शांतप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

Manuscript ID: IJAAR-130332
ISSN: 2347-7075
Impact Factor – 8.141

Volume - 13
Issue - 3
January – February 2026
Pp. 173 - 179

Submitted: 15 Jan.2026
Revised: 20 Jan. 2026
Accepted: 30 Jan. 2026
Published: 10 Feb. 2026

*Corresponding Author:*
डॉ. कन्नाडे ममता कार्तिक

Quick Response Code:

Website: https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.18537843

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.18537843

Creative Commons

OPEN ACCESS

**सारांश:**

आज जेव्हा आपण समाजातील व्यक्तींच्या दैनंदिन आयुष्याकडे पाहतो तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्ता ही प्रत्येक मानवाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनलेली पहावयास मिळते. व्यक्तीची सुरुवात कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत होते. आपल्याला या माध्यमातून हवामानाचा अंदाज घेता येतो, आपण कोणत्या बातम्या वाचाव्यात, आपल्याला काय वाचायला आवडतं हे एआय ठरवत, दिवसभराच्या नियोजनाची आठवण ए आय करून देतो, त्या माध्यमातून फोन अनलॉक करता येतो, आपल्याला आलेल्या मेसेजमध्ये देखील एआय असतो, ए आय संशयास्पद नंबर ओळखतो आणि इशारा देतो, तो आपल्याशी बोलतो, प्रवासात आपल्याला मदत करतो, आरोग्याची काळजी घेतो किंवा त्या संदर्भात मार्गदर्शन करतो तसेच उपचारासाठी मदतही करतो. एकंदर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून समाजाचा सर्वांगीण अभ्यास करता येतो.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*डॉ. कन्नाडे ममता कार्तिक. (2026). भारतीय समाजाच्या अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेची (AI) भूमिका. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 173 –179. https://doi.org/10.5281/zenodo.18537843*

**प्रस्तावना :**

भारतीय समाज हा मुळातच संमिश्र स्वरूपाचा आहे. अनेक समूहाचा त्यात समावेश होतो. त्याचबरोबर जगातील सर्व प्रकारच्या लहान मोठ्या विविधता भारतीय समाजात दिसून येतात. विविध समुदाय, संस्कृती, वंश, भाषा, धर्म, पंथ, जाती, जमाती इत्यादीचा मिलाफ भारतीय समाजात दिसून येतो. म्हणजेच भारतीय समाज ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि संरचनात्मक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात औद्योगिकीकरण, शहरीकरण, लोकशाहीकरण आणि जागतिकीकरणामुळे समाजात मोठी बदल घडून आले. या

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

बदलाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठीच समाजशास्त्राच्या विविध शाखा निर्माण झाल्या. तसेच अलीकडे माहिती व तंत्रज्ञान, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता याच्या क्रांतीनंतर तर सामाजिक वास्तव्याचे स्वरूप अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. समाजातील सामाजिक व्यवहारात कृत्रिम बुद्धिमत्तेने सहज प्रवेश केला आहे. ही प्रक्रिया म्हणजे व्यापक तंत्र सामाजिक क्रांती ठरत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी कार्ये करण्यास सक्षम बनविण्याची प्रक्रिया होय. यामध्ये शिकणे, तर्क करणे, भाषा समजून घेणे, प्रतिमा ओळखणे आणि निर्णयक्षमता यांचा समावेश होतो. १९५० नंतर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) संशोधनाला प्रारंभ झाला असला तरी २१ व्या शतकात AI चा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. भारतीय संदर्भात त्याचा वापर प्रशासन, आरोग्य, शिक्षण, कृषी, धार्मिक इत्यादी क्षेत्रात होत आहे. भारतीय समाजात याचा सखोल प्रभाव पडत आहे. या बदला सोबत एक प्रकारची अस्वस्थता, संभ्रम आणि गोंधळी वाढताना दिसतो.

२१ व्या शतकात कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तांत्रिक संकल्पना न राहता सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. भारतीय समाज हा जात, वर्ग, लिंग, धर्म, भाषा, प्रदेश, परंपरा तसेच आधुनिकतेच्या गुंतागुंतीच्या परस्पर संबंधांनी निर्माण झाला. त्यामुळे समाजाच्या सामाजिक वास्तव्याचे विश्लेषण करणे हे नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे. तेव्हा भारतीय सामाजिक वास्तवाच्या अभ्यासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग कशा पद्धतीने होऊ शकतो याचे विश्लेषण सदर संशोधन पेपर मध्ये करण्यात आले आहे.

**उद्दिष्टे :**

- भारतीय समाजाची रचना, विविधता व विषमता यांचे समाजशास्त्रीय स्वरूप समजावून घेणे.
- भारतीय समाजाच्या अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर कसा करता येतो याचे चिकित्सक विश्लेषण करणे.

**अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्री वर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटद्वारे माहिती गोळा करून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सिद्धांतिक दृष्टिकोन :**

मार्क्सवादी आणि संरचनावादी सिद्धांताच्या आधारे कृत्रिम बुद्धिमत्तेचा समाजावरील परिणाम या विषयाचा अभ्यास केल्यास ही तंत्रज्ञान व्यवस्था सामाजिक संबंध कसे पुनरुत्पादित करते हे स्पष्ट होते. समाजातील बेरोजगारी, स्थलांतर, गुन्हेगारी, जातीय हिंसा यासारख्या समस्या कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे ओळखता व अभ्यासता येते.

**भारतीय समाजाचे स्वरूप:**

एक सामाजिक व्यवस्था या अर्थाने समाज ही संकल्पना समाजशास्त्रात वापरली जाते. समाज म्हणजे परस्परांशी अंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांची मिळून बनलेली एक व्यापक अंतरक्रियांची व्यवस्था होय. भारतीय समाज समजून घेताना खालील प्रमुख घटक विचारात घ्यावे लागतात.

**जातिव्यवस्था:**

भारतीय समाज प्राचीन काळापासून जातीमध्ये विभागला गेला आहे. आज घटनात्मक पातळीवर जातीभेद

आपण मानत नसलो तरी मानसिक पातळीवर जातीयता आढळून येते. यातून समाजाचे विभाजन होऊन त्यातून मोठी विषमता समाजामध्ये पाहावयास मिळते.

**वर्ग व आर्थिक विषमता:**

भारतामधील आर्थिक विषमता ही आज अत्यंत ज्वलंत व गंभीर स्वरूपाची सामाजिक-आर्थिक समस्या बनली आहे. अलीकडील अहवालांनुसार (२०२३-२५) भारताचा आय-आधारित विषमता निर्देशांक सुमारे ०.४१ इतका असून तो १९५० च्या दशकापेक्षा अधिक आहे, याचा अर्थ उत्पन्नाचे वितरण अधिक असमान झाले आहे. देशातील वरच्या १% लोकांकडे सुमारे २२- २३ % राष्ट्रीय उत्पन्न, तर वरच्या १०% लोकांकडे जवळपास ५७-५८% उत्पन्न केंद्रित आहे; याउलट खालच्या ५०% लोकांना केवळ १४-१५% उत्पन्न मिळते आणि खालच्या १०% लोकांचा वाटा फक्त २% च्या आसपास आहे. संपत्तीच्या बाबतीत विषमता आणखी तीव्र असून संपत्ती-आधारित विषमता निर्देशांक सुमारे ७५ आहे; वरच्या १% लोकांकडे सुमारे ४०% संपत्ती, वरच्या १०% लोकांकडे ६५%, तर खालच्या ५०% लोकांकडे अवघी ६-७% संपत्ती आहे. कोरोना महामारीनंतर ही दरी अधिक वाढली असून अप्रत्यक्ष करांचा (GST) भार, शिक्षण-आरोग्य-रोजगारातील असमान संधी आणि राज्यांतील आर्थिक तफावत यामुळे विषमता तीव्र होत आहे. एकूणच, भारतातील आर्थिक विकासाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात न पोहोचता तो मर्यादित श्रीमंत गटाकडे अधिक प्रमाणात केंद्रित होत असल्याचे ही आकडेवारी स्पष्टपणे दर्शवते.

**लिंगभेद:**

लिंगभेद म्हणजे स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय संधींचा असमानपणा आहे. याआधारे लैंगिक असमानता समाजात पहावयास मिळते. महिलांची कार्यबलात सहभाग पुरुषांच्या तुलनेत खूप कमी आहे, आणि बहुतांश महिलांना घरगुती कामे करावी लागतात व बाहेर काम केल्यास त्यांना कमी वेतन मिळते ज्यामुळे आर्थिक स्वतंत्रता मर्यादित होते. भारतात काही प्रगती झाली आहे (उदा. महिला साक्षरता आणि काही आरोग्य निर्देशक), परंतु वेतन आणि निर्णय घेण्याच्या भूमिकांमध्ये स्त्रियांचा प्रतिनिधीत्व कमी आहे.

**धर्म व सांप्रदायिकता :**

भारत हा बहुधार्मिक देश असला तरी सामाजिक, आर्थिक व राजकीय स्तरावर धर्माधारित भेद आणि सांप्रदायिकता आढळते. काही धार्मिक समुदायांना शिक्षण, रोजगार, उत्पन्न, निवास व राजकीय प्रतिनिधित्व यांमध्ये तुलनेने कमी संधी मिळाल्याचे दिसून येते. धार्मिक ओळखीच्या आधारे निर्माण होणारे पूर्वग्रह, दंगली, द्वेषमूलक भाषण आणि राजकीय ध्रुवीकरण यामुळे सामाजिक ऐक्याला धोका निर्माण होतो. यामुळे सामाजिक विश्वास कमी होऊन विकास प्रक्रियेत असमानता वाढते आणि लोकशाही मूल्यांवरही विपरीत परिणाम होतो.

**भाषिक व सांस्कृतिक विविधता :**

भारत हा जगातील सर्वाधिक भाषिक व सांस्कृतिकदृष्ट्या विविध देशांपैकी एक आहे. येथे २२ अधिकृत भाषा, शेकडो मातृभाषा, विविध बोली, धर्म, परंपरा, सण-उत्सव, कला, लोकसंस्कृती व जीवनपद्धती अस्तित्वात आहेत. ही विविधता भारतीय समाजाची ओळख व शक्ती असून "विविधतेत एकता" हे तत्त्व यावर आधारित आहे. मात्र भाषिक अस्मिता, प्रादेशिकता, सांस्कृतिक वर्चस्व किंवा दुर्लक्ष यामुळे कधी कधी सामाजिक तणाव, भेदभाव व संघर्षही

निर्माण होतात. त्यामुळे सांस्कृतिक समावेशन, परस्पर आदर आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**ग्रामीण व शहरी भेद:**

भारतामध्ये ग्रामीण व शहरी भागांमध्ये उत्पन्न, रोजगार, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा व जीवनमान यांमध्ये मोठी असमानता आढळते. शहरी भागात उद्योग, सेवा क्षेत्र, शिक्षणसंस्था व आरोग्य सुविधा तुलनेने अधिक विकसित असल्यामुळे रोजगाराच्या संधी व उत्पन्न जास्त असते, तर ग्रामीण भागात कृषीवर अवलंबित्व, कमी औद्योगिकीकरण, अपुरी पायाभूत साधने आणि मर्यादित सार्वजनिक सेवा यांमुळे विकासाची गती कमी राहते. या भेदामुळे स्थलांतर, दारिद्र्य, सामाजिक असुरक्षा आणि प्रादेशिक विषमता वाढताना दिसते.या वैशिष्ट्यामुळे भारतीय समाजाला अत्यंत गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त होते. या सर्व घटकाचा अभ्यास करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग अत्यंत उपयुक्त ठरू शकतो.

**समाजव्यवस्थेच्या अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

यामध्येच आर्टिफिशल इंटेलिजन्सचा वापर करून डीपफेक, फेक व्हिडिओज अशा गोष्टी करणे मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. एक चांगल्या रेझोल्युशनचा फोटो मिळाला की त्यावरून आपल्याला तंतोतंत आपल्यासारखीच दिसणारी आणि चालणारी व्यक्ती निर्माण करता येते. आपल्या आवाजातली फक्त ३० सेकंदाची क्लिप मिळाल्यास त्यावरून आपला आवाज सुद्धा क्लोन करता येतो. त्याचा वापर करून आपल्या आवाजात आपण काहीतरी विचित्र किंवा अश्लील बोलतो आहोत असा फेक व्हिडिओ तयार करता येतो. हे खूपच धोकादायक आहे. कंपनीचा सीईओ त्यांच्या फायनान्स डायरेक्टरला कुठल्यातरी अकाउंटमध्ये काही मिलियन डॉलर्स ट्रान्सफर करायला सांगतो आणि फायनान्स डायरेक्टरचा त्याच्यावर विश्वास बसल्यामुळे ते पैसे भलत्याच अकाउंटला ट्रान्सफर झाल्याच्या कहाण्या प्रसिद्ध आहेत. किंवा कुठल्यातरी वडिलांना स्वतःच्या मुलीच्या आवाजात ती मुलगी संकटात सापडली आहे, तिचे पैसे चोरीला गेले आहेत आणि तिला ताबडतोब पैशांची गरज आहे असे जेव्हा सांगण्यात येते, तेव्हा हतबल होऊन बिचारे वडील ते पैसे सायबर गुन्हेगाराच्या खात्यामध्ये ट्रान्सफर करतात अशाही घटना घडलेल्या आहेत.

**जातीव्यवस्थेचा अभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग :**

जातीआधारित सामाजिक-आर्थिक विश्लेषण - जनगणना, SECC, NSSO, NFHS यांसारख्या डेटावर AI वापरून जातींनुसार शिक्षण, उत्पन्न, रोजगार, आरोग्य व दारिद्र्यातील फरक स्पष्ट करता येतो. शाळा, नोकरी, निवास, विवाह व सार्वजनिक सेवांमध्ये होणाऱ्या जातीय भेदभावाचे स्वरूप शोधता येते. सोशल मीडिया, वर्तमानपत्रे, तक्रारी, न्यायालयीन निकाल यांचे विश्लेषण करून जातीय पूर्वग्रह, द्वेषमूलक भाषा व भेदभावी प्रवृत्ती ओळखता येतात.धोरणांचा जातीनिहाय परिणामाचा अभ्यास करता येतो जसे की आरक्षण, सामाजिक न्याय योजना व कल्याणकारी कार्यक्रमांचा लाभ कोणत्या जातींना किती मिळतो हे AI-आधारित प्रभाव मूल्यांकनाने तपासता येते. तसेच AI + GIS वापरून जातीनुसार वसाहती, शैक्षणिक-आरोग्य सुविधांचे वितरण व प्रादेशिक असमानता नकाशावर दाखवता येते आणि सामाजिक गतिशीलतेचे विश्लेषण करता येते.

**समाजातील आर्थिक विषमता अभ्यासण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग :**

जनगणना, करआकडेवारी, बँकिंग व रोजगार डेटावर AI वापरून उत्पन्न, खर्च, संपत्ती व दारिद्र्यतील तफावत स्पष्ट करता येते.लिंग, जात, प्रदेश व शिक्षणानुसार आर्थिक विषमता अभ्यासता येते. कल्याणकारी योजना, सबसिडी, करप्रणाली व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ कोणत्या गटांना किती मिळतो हे AI-आधारित विश्लेषणाने तपासता येते. AI मॉडेल्सद्वारे बेरोजगारी, दारिद्र्य व उत्पन्नातील बदलांची दिशा व तीव्रता अंदाजित करता येते. अहवाल, बातम्या व धोरणाचे विश्लेषण करून आर्थिक विषमतेवरील स्वरूप समजते. AI चा वापर केल्यास आर्थिक विषमतेचा अभ्यास अधिक वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ व धोरणात्मक निर्णयांसाठी उपयुक्त ठरतो.

**समाजातील लिंगभेदाचा अभ्यास करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग :**

लिंगनिहाय डेटा विश्लेषण AI द्वारे विश्लेषित करून स्त्री-पुरुषांमधील उत्पन्न, शिक्षण, आरोग्य व रोजगारातील असमानता स्पष्ट करता येते. वेतनातील लिंगभेद, पदोन्नतीतील अडथळे व कार्यस्थळी असमान संधी शोधता येतात.सोशल मीडिया, बातम्या, तक्रारी व धोरण दस्तऐवजांचे विश्लेषण करून लिंगाधारित पूर्वग्रह, ओळखता येते.धोरणांचा परिणामाचे मूल्यमापन करता येते.महिला कामगार सहभाग, शिक्षणातील प्रगती व लिंगसमतेची भविष्यातील दिशा ठरवता येते.

**समाजातील धार्मिक विविधता तसेच धर्म व सांप्रदायिकतेचा अभ्यास करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

AI वापरून विविध धार्मिक समुदायांतील शिक्षण, रोजगार, उत्पन्न, आरोग्य व जीवनमानातील फरक अभ्यासता येतात. सांप्रदायिक पूर्वग्रह व द्वेषभाषण ओळखता येते.अल्पसंख्याक कल्याण योजना, शिक्षण व रोजगार धोरणांचा विविध धार्मिक गटांवर होणारा परिणाम AI-आधारित मूल्यांकनाने तपासता येतो.

**भाषिक व सांस्कृतिक विविधतेचा अभ्यास करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

जनगणना, शैक्षणिक व सांस्कृतिक डेटावर AI वापरून भाषा-वापर, द्विभाषिकता, बोलींचे वितरण व भाषिक अल्पसंख्याकांची स्थिती अभ्यासता येते. Machine Learning वापरून सण, परंपरा, कला, खाद्यसंस्कृती व जीवनशैलीतील साम्य-भेद व त्यातील बदल अभ्यासता येतात. भाषा संवर्धन, मातृभाषा शिक्षण व सांस्कृतिक संरक्षण योजनांचा परिणाम AI-आधारित विश्लेषणाने तपासता येतो. AI वापरून दुर्मिळ भाषा, बोली, लोककला व परंपरांचे डिजिटल दस्तऐवजीकरण व जतन करता येते.

**शैक्षणिक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

शैक्षणिक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर केवळ तांत्रिक वापर न राहता ज्ञान निर्मितीच्या प्रक्रियेवर परिणाम करणारा एक महत्त्वाचा सामाजिक प्रश्न बनला आहे. AI वापरून साक्षरता, नावनोंदणी, गळती (dropout), शैक्षणिक प्रगती व असमानता अभ्यासता येते. Machine Learning द्वारे ग्रामीण-शहरी, लिंग, जात, आर्थिक स्तर व प्रदेशनिहाय शैक्षणिक तफावत शोधता येते. AI-आधारित प्रणाली

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

विद्यार्थ्यांच्या गरजा, गती व क्षमतेनुसार अध्ययन साहित्य व मार्गदर्शन देऊ शकतात. शाळा-महाविद्यालयांचे वितरण, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर व पायाभूत सुविधांचा अभ्यास करता येतो. भविष्यतील शैक्षणिक प्रगती वाढवणे व कौशल्य गरजांचा अंदाज करता येतो.

**खेळ आणि समाज यांच्या आभ्यासात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

खेळ आणि समाज यांचा संबंध अतिशय घनिष्ठ व परस्परावलंबी आहे. खेळ हे केवळ शारीरिक मनोरंजनाचे साधन नसून समाजातील मूल्ये, संस्कृती, शिस्त, सहकार्य आणि स्पर्धात्मकता यांचे प्रतिबिंब असतात. समाजातील सामाजिक रचना, आर्थिक स्थिती, लिंगभेद आणि राजकारण यांचा प्रभाव खेळांवर दिसून येतो. त्याचप्रमाणे खेळांमुळे सामाजिक एकात्मता, राष्ट्रीय भावना, युवकांचे व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक समावेशन घडून येते. खेळ हे जात, धर्म, भाषा आणि वर्ग यांच्या सीमा ओलांडून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम ठरतात. त्यामुळे समाजाच्या घडणीत आणि परिवर्तनात खेळांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यामध्ये देखील एआय वापरले जाऊ शकते. एआय' ठरवल व्यूहरचना आणि खेळाडूंच्या हालचाली क्रिकेटच्या काही लीग मॅचेसमध्ये रोबोट अंपायर्स वापरणं सुरूही झालेलं आहे. प्रत्येक खेळाडूचे गुणदोष, मैदानाची स्थिती आणि प्रतिपक्षाचे स्ट्रॉग किंवा वीक पॉइंट्स काय आहेत याचा विचार करून व्यूहरचना ठरवाव्या लागतात. हेही काम करण्यासाठी आज 'एआय' खूप मदत करतं. आता 'एआय' जिंकण्यासाठी काय व्यूहरचना करायची आणि खेळाडूने कुठल्या खेळी करायच्या हेही 'एआय' सांगेल

**आरोग्य क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) चा उपयोग:**

समाजातील व्यक्तीचे आरोग्य ही समाजाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. व्यक्तीचे आरोग्य बिघडले तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर त्याचबरोबर एकूण व्यक्तीच्या विकासावर पडू शकतो. आणि याचा अप्रत्यक्ष परिणाम समाजावर होत असतो तेव्हा आरोग्याचाही अभ्यास किंवा विविध रोगावर उपाय कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून करता येतो.

- आधुनिक तंत्रज्ञानाने ज्येष्ठांच्या अनेक प्रश्नावर उत्तर शोधले आहेत. विशेषकरून तोल जाऊन पडण्याची शक्यता असलेल्या ज्येष्ठांच्या संगोपनात त्यांचा उपयोग होतो. ही डिव्हायसस सेट करताना एखाद्या तातडीच्या प्रसंगात त्याबद्दलचा मेसेज कुणाला जाणार हे निवडता येतं. त्यातूनच मग 'फॉल डिटेक्शन' सारखं फीचर काम करते.
- माता मृत्युदर कमी करण्यासाठी.. प्रत्येक गर्भधारणेत काही लपलेले धोकेही असतात. एआयमुळे ते लवकर दिसतात आणि त्वरित उपाययोजना करता येतात. हिमोग्लोबिन, रक्तदाबातील बदल, बीएमआय, साखरेची पातळी, थायरॉइड तपासणी, अल्ट्रासाऊंड यांसह आईचा पूर्वेइतिहास आणि आरोग्यसेवेपर्यंतचे अंतर अशा घटकांचा अभ्यास करून एआय उच्च-जोखमीच्या माता ओळखते.

**संदर्भसूची (References)**

1. फुले ज्योतीराव (१८८२) शेतकऱ्याचा आसूड. पुणे: सत्यशोधक समाज.
2. आंबेडकर बी. आर. (२०१४) जातिव्यवस्थेचा उच्छेद (मराठी अनुवाद). मुंबई: सुगावा प्रकाशन.
3. Karhade, B. M., & Raut, K. (2016). भारतीय समाज व संस्कृती. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026


4. Patil, V. B. (2015). संपूर्ण समाजशास्त्र. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
5. Deshpande, S. (2018). भारतीय समाजशास्त्र : संकल्पना व वास्तव (मराठी अनुवाद). पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.
6. Bourdieu, P. (1991). *Language and Symbolic Power*. Cambridge: Polity Press.
7. Government of India. (2018). *National Strategy for Artificial Intelligence*. NITI Aayog, New Delhi.
8. UNESCO. (2021). *Recommendation on the Ethics of Artificial Intelligence*. Paris: UNESCO.
9. World Inequality Lab (2024), World Inequality Report 2024, Paris: World Inequality Lab.
10. VISION IAS Drishti IASinsightsonindia.com
11. Government of India (2006), Report of the Sachar Committee on Social, Economic and Educational Status of the Muslim Community in India, New Delhi: Prime Minister's High Level Committee.
12. Government of India (2011), Census of India 2011: Language and Cultural Data, New Delhi: Office of the Registrar General & Census Commissioner, India.
13. Government of India (2011), Census of India 2011, New Delhi: Office of the Registrar General & Census Commissioner, India.
14. दैनिक वर्तमानपत्र:
    - सकाळ- ५/१०/२०२५ पेज ५
    - सकाळ- १९/१०/२०२५ पेज २
    - सकाळ- ४/०१/२०२६ पेज ४
    - लोकमत ५/१०/२०२५ पेज २